# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 17 April 2024

## Time 18.10 to 18.20

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक – १७ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०

****

- लोकसभा निवडणुकीत पहिल्या टप्प्यातला प्रचार थांबला;उद्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना
- उमेदवारी अर्ज प्रक्रियेसाठी औरंगाबाद, जालना आणि बीड प्रशासकीय यंत्रणा सज्ज
- जळगाव इथं एका रसायन कारखान्याला लागलेल्या आगीत एक जण ठार तर २५ जखमी

आणि

- रामनवमीचा सोहळा देशभरात उत्साहात साजरा

****

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यामध्ये होणाऱ्या मतदानाचा प्रचार आज थांबला. या टप्प्यात महाराष्ट्रातल्या नागपूर, रामटेक, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर या पाच मतदार संघात परवा १९ एप्रिलला मतदान होत आहे. आज अखेरच्या दिवशी सर्वच प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी प्रचार फेऱ्या काढून मतदारांचं लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला.

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत परवा १९ तारखेला संपणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या उस्मानाबाद आणि लातूर सह अकरा मतदार संघात सात मे रोजी मतदान होणार आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याची अधिसूचना उद्या जारी होणार आहे. या टप्प्यात मराठवाड्यातल्या औरंगाबाद, बीड आणि जालन्यासह, नंदूरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या एकूण अकरा

मतदार संघात उद्यापासून नामनिर्देशन पत्र भरण्यास सुरुवात होईल, २५ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येणार असून, २६ एप्रिलला अर्जांची छाननी तर २९ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहे. या सर्व मतदार संघात १३ मे रोजी मतदान होणार आहे.

****

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघासाठी निवडणूक प्रक्रिया उद्यापासून सुरु होणार आहे. जिल्हा प्रशासनाने यासाठीची सर्व तयारी केली आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी या पूर्वतयारीचा आज अंतिम आढावा घेतला. दरम्यान, अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता, वाहतुकीची कोंडी होऊन, नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून येत्या २९ तारखेपर्यंत, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील वाहतुक सकाळी ९ ते सायंकाळी ६ दरम्यान इतर मार्गाने वळवण्यात आली आहे.

****

जालना मतदार संघासाठीही उद्या पासून उमेदवार नामनिर्देशन पत्र भरण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने उमेदवारांना आपलं नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी, suvidha.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध करुन दिलेलं आहे. कॅन्डिडेट ॲप किंवा पोर्टल वरुन देखील उमेदवारांना ऑनलाईन नामनिर्देशन भरता येणार आहे. जालना इथले उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी ही माहिती दिली. दरम्यान, निवडणुकीच्या अनुषंगाने जालना जिल्ह्यात २३ स्थिर तर १८ भरारी पथकं तैनात करण्यात आली आहेत.

****

बीड लोकसभा सार्वत्रिक निवडणूक अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या माध्यम सनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती कक्षाला, जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी आज भेट देऊन पाहणी केली. या मतदार संघात उद्यापासून सुरू होत असलेल्या नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या अनुषंगाने, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी आज पाहणी केली. बीड लोकसभा मतदारसंघात, अवैध मद्य वाहतूक तसंच विक्री यावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागातर्फे मोहीम राबविण्यात येत असून, या अंतर्गत आतापर्यंत ९२ प्रकारचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

****

नांदेड मतदार संघात मतदार चिठ्ठी वाटप गतीने सुरू असून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी काही मतदारांच्या घरी पोल चीट अर्थात मतदार माहिती चिठ्ठी पोहोचवून मतदान करण्याचं आवाहन केलं. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते यावेळी काही नवमतदारांनी मतदार माहिती चिठ्ठी स्वीकारून मी मतदान करणारच, असा निर्धार केला. जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी ज्येष्ठ मतदारांची भेट घेऊन, त्यांना गृहमतदान सुविधेबाबत माहिती दिली. जिल्ह्यात १२ डी फॉर्म भरून ६९९ ज्येष्ठ मतदारांनी गृहमतदान करण्याचा पर्याय स्वीकारला आहे.

****

जळगाव इथं आज एका रसायन कारखान्याला लागलेल्या आगीत एक कामगार ठार तर २५ हून अधिक जण गंभीररित्या होरपळले आहेत. डब्ल्यू-सेक्टर मधील मोरया केमिकल कंपनीत ही भीषण दुर्घटना घडली. जखमींपैकी पाच जणांची प्रकृती गंभीर आहे. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रुग्णांची तसंच त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. दरम्यान, जळगाव महापालिका आणि जैन कंपनीच्या अग्निशमन बंबांकडून सायंकाळपर्यंत आग विझविण्याचे प्रयत्न सुरू होते.

****

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात बोल्डा फाटा इथं अचानक लागलेल्या आगीत हॉटेल, कपड्याचे दुकान आणि ऑटोमोबाइल्ससह चार दुकानं खाक झाली, काल रात्री ही घटना घडली. या घटनेत मोठं नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

****

श्रीरामनवमी आज सर्वत्र भक्तिभावानं साजरी करण्यात आली. रामजन्मभूमी अयोध्येत आज नव्याने बांधलेल्या श्री रामलल्ला मंदिरात प्रथमच रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. दुपारी ठीक १२ वाजता बाळरामाच्या कपाळावर सूर्यकिरणांनी प्रकाश टाकत 'सूर्य तिलक' लावला गेला. बाळरामची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर ही पहिलीच रामनवमी असल्यामुळे भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

राज्यातही रामनवमी उत्सव सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे.

✻ छत्रपती संभाजीनगर इथं किराडपुरा तसंच समर्थ नगर इथल्या राम मंदिरासह शहरात ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये दुपारी १२ वाजता रामजन्म सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वच मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली आहे. यानिमित्तानं रक्तदानशिबीर, आरोग्य तपासणी शिबीर तसंच प्रसाद वाटपासह विविध कार्यक्रम राबवण्यात आले.

✻ धाराशिव इथं समर्थ नगर श्रीराम मंदिरात रक्तदान शिबीर घेण्यात आलं. या रक्तदान शिबिरात पहिल्याच वर्षी महिला पुरुषांचा उत्स्फूर्त सहभाग मिळाला.

✻ जुना जालना भागातील श्रीराम मंदिरामध्ये रामजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा झाला. यावेळी रामदास महाराज आचार्य यांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रभु श्रीरामाचं वर्णन केलं.

✻ यवतमाळ जिल्ह्यात गावागावात प्रभू श्रीरामाच्या शोभायात्रा काढण्यात आल्या, तसंच शहरात पहाटे पारंपारिक वेशभूषेत रामभक्तांनी प्रभात फेरी काढली.

✻ अकोला शहरात श्रीराम जन्मोत्सव शोभायात्रा समितीच्या वतीने शहराच्या प्रमुख चौकांमध्ये भगव्या पताकांनी आकर्षक विद्युत रोषणाई, नेत्रदीपक सजावट करण्यात आली होती तसंच अठरा फूट उंच हनुमान देखावाही उभारण्यात आला आहे.

✻ धुळे शहरात श्रीराम नवमी उत्सव समितीच्या वतीने आज सकाळी धुळे शहरातून दुचाकी फेरीसह शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत तरुण, तरुणींसह राम भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले. शोभायात्रेत अयोध्येतल्या बाळरामासारखी हुबेहूब मूर्ती सर्वांचं लक्ष वेधून घेणारी ठरली.

✻ नाशिक इथं शेकडो भाविकांच्या उपस्थितीत श्री काळाराम मंदिरामध्ये राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल ताशांच्या गजरात श्री गोरा राम मंदिर आणि अन्य मंडळांमध्येही रामजन्मोत्सव साजरा झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

✻ रत्नागिरी जिल्ह्यात पावसमधल्या श्रीराम मंदिरातला रामनवमी उत्सवदेखील प्रसिद्ध असून, यंदाही गुढीपाडव्यापासून हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला.

राज्यात गोंदवले, सज्जनगड तसंच जालना जिल्ह्यात जांबसमर्थ इथंही भाविकांनी रामनवमीनिमित्त श्रीरामाच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

✻ शिर्डी इथं श्री साईबाबा मंदिरात आज दुपारी रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला. इतरही धार्मिक विधी परंपरेनुसार पार पडले. आज उत्सवाचा मुख्य दिवस असल्याने भाविकांना दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुलं राहणार आहे.

****

देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी मानल्या जाणाऱ्या वणी येथील श्री सप्तशृंगी देवीच्या चैत्रोत्सवाला आजपासून प्रारंभ झाला. येत्या हनुमान जयंती पर्यंत हा चैत्रोत्सव चालणार असून त्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाने जय्यत तयारी आहे. एस टी महामंडळाच्या वतीने उत्सव काळात सुमारे अडीचशे जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

****

अकोल्यामध्ये, 'स्वीप' अंतर्गत मतदारांमध्ये निवडणूक प्रक्रिया आणि मतदानाबाबत जागृती करण्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी १० हजार विद्यार्थी एकाचवेळी प्रतिज्ञा घेणार आहेत. या उपक्रमाचा मुख्य कार्यक्रम लालबहादूर शास्त्री क्रीडांगण इथं येत्या शुक्रवारी सकाळी साडे सात वाजता होणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यात मतदान जनजागृतीसाठी एलईडी चित्ररथ तयार करण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत, स्वीपचे नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून आज एलईडी रथ रवाना करण्यात आले.

****

यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बाबासाहेब दोडतले यांनी आज परभणी इथं पत्रकार परिषद घेऊन महायुतीचे परभणीचे उमेदवार महादेव जानकर यांना यशवंत सेनेचा पाठिंबा असल्याचं जाहीर केलं.

****